उप आयुक्त(झोनिपु)कार्यालय
चाळ विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्र.: सीएसओ/१६१४
दि.:१४/२/२०१४

## कार्यालय परिपत्रक

**विषयः-** **पुणेमहानगरपालिका वेबसाईटवर मनपा वसाहतीतील सदनिका वाटपाबाबत आवक अर्जाचे दिनांकानुसार तयार करण्यात आलेल्या अंतिम सदनिका वाटप प्रतिक्षायादी बाबत.**

**संदर्भः-** १) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/११७, दि. ११/६/२०१३.
२) अतिरिक्त महापालिका आयुक्त (ईस्टेट) कार्यालयाकडील कार्यालयीन परिपत्रक जा.क्र. अतिमआ(ई)/सीएसओ/११४१, दि. २५/१०/२०१३.
३) सदनिका वाटप समितीची दि. ५/२/२०१४ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

सर्व खातेप्रमुख, सर्व विभागीय कार्यालयांचे सह/उप आयुक्त, सर्व क्षेत्रिय कार्यालयांचे महापालिका सहाय्यक आयुक्त, विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ नुसार पुणेमहानगरपालिकेतील वसाहतीमध्ये विविध संवर्गातील ज्या सेवकांची पुणेमहानगरपालिका हद्दीत राहण्याची सोय नाही अशा सेवकांची त्यांनी केलेल्या अर्जाच्या दिनांकानुसार प्रारूप प्रतिक्षायादी तयार करण्यास मा. महापालिका आयुक्त यांची ठरावान्वये मान्यता प्राप्त झाली असुन त्याप्रमाणे चाळ विभागामार्फत प्रारूप प्रतिक्षायादी तयार करण्यात आली व सदर प्रारूप प्रतिक्षायादी पुणेमहानगरपालिका वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली होती.

संदर्भ क्र. २ अन्वये कार्यालयीन परिपत्रक प्रसृत करून मुदतीत अर्ज केलेल्या ज्या सेवकांची नावे सदर यादीत नाहीत किंवा ज्या सेवकाचे नाव, हुद्दा, खात्याचे नाव, नेमणुक दिनांक, सेवानिवृत्त दिनांक, आवक अर्ज क्रमांक व दिनांक, सेवकाची श्रेणी तसेच सेवकाचे प्रारूप प्रतिक्षा यादीतील तपशिलात चुका असतील अथवा त्यात काही त्रुटी असतील अशा कर्मचा-यांनी त्याबाबत त्यांच्या हरकती पुराव्यासह उप आयुक्त (झोनिपु) कार्यालय, चाळ विभाग, पुणेमहानगरपालिका यांचेकडे दिनांक १५/११/२०१३ पर्यंत लेखी सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

संदर्भ क्र. ३ अन्वये मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ईस्टेट) यांचे दालनात दि. ५/२/२०१४ रोजी सदनिका वाटप समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर सदनिका वाटप समितीचे निर्णयानुसार अंतिम सदनिका वाटप प्रतिक्षायादीस मान्यता मिळाली असुन त्यानुसार चाळ विभागामार्फत वाटप सुरू करण्यात येत आहे. आवक अर्जाचे दिनांकानुसार तयार करण्यात आलेली अंतिम सदनिका वाटप प्रतिक्षायादी पुणेमहानगरपालिका संकेत स्थळावर पाहण्यास उपलब्ध आहे.

तरी सर्व खातेप्रमुख यांनी आपले अखत्यारितील सर्व विभागातील, शाळांतील, दवाखाने व रूग्णालयातील सर्व कर्मचा-यांना सदर परिपत्रकाबाबत माहिती देण्याची व्यवस्था करावी.

१३/२/२०१४

उप आयुक्त (झो नि पु)
पुणे महानगरपालिका

१. मा. महापालिका आयुक्त
२. मा. अति. महा. आयुक्त (जनरल)/ (विशेष)/(इस्टेट)
पुणेमहानगरपालिका

यांजकडेस माहितीसाठी सादर...

प्रत :-

१. सर्व मा. खातेप्रमुख
२. सर्व सह महापालिका आयुक्त (क्र. २ व ३)
३. मा. उप आयुक्त (क्र. १ ते ४)
४. मा. महापालिका सहाय्यक आयुक्त (क्षेत्रिय कार्यालय क्र. १ ते १५)
पुणेमहानगरपालिका

यांजकडेस पुढील कार्यवाहीसाठी...

D:\data\my document\Chall Adhikshak\Genral.doc